## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**
**द्वितीय अपील क्रमांक :- ४२०६/२०१७/नाशिक मधील शास्तीचे प्रकरण**

१ श्री. महेमुद शाह हाजी गफुर शाह, : अपिलार्थी
रा.४५, निहाल नगर, गट नं.१, मालेगांव,
ता.मालेगांव, जि.नाशिक.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गॅरेज इन्चार्ज, मालेगांव महानगरपालिका,मालेगांव,
ता.मालेगांव, जि.नाशिक.

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहाय्यक आयुक्त(प्रशासन), मालेगांव
महानगरपालिका, मालेगांव, ता.मालेगांव, जि.नाशिक.

**विवेचन**

अपिलार्थी यांनी दिनांक २०/०६/२०१७ रोजीच्या माहिती अर्जान्वये, खालीलप्रमाणे माहिती मिळण्याची विनंती केली होती.

दि.०१/०४/२०१६ ते दि.२५/०४/२०१७ या कालावधीत मालेगांव महानगरपालिका, मालेगांव यांचे १. वाहन क्रमांक एम.एच.४१, ए-१८६ बाबत सदर वाहन माहापालिका हद्दीबाहेर गेल्याने याबाबत मा.आयुक्तांनी मान्यता दिले असल्याचे मान्यता प्रत, २.सदर वाहन बाहेरगांवी घेऊन जाणेबाबत मान्यता मिळणेबाबतच्या पत्रांची प्रत, ३. सदर वाहन दि.०१/०४/२०१६ ते दि.२५/०४/२०१७ या कालावधीत देण्यात आलेल्या इंधनाची सविस्तर माहिती.

२) त्यानुषंगाने दाखल उपरोक्त द्वितीय अपिलामध्ये आयोगाने दिनांक २३/०४/२०१९ रोजी पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:-

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा गॅरेज इन्चार्ज, मालेगांव महानगरपालिका, मालेगांव, ता.मालेगांव, जि.नाशिक, यांनी अपिलार्थी यांच्या दि.२०/०६/२०१७ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकारी अधिनियम,२००५, चे कलम २०(१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३) सदर आदेशास अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा गॅरेज इन्चार्ज, मालेगांव महानगरपालिका, मालेगांव, श्री. सचिन साहेबराव पाटील, यांनी आयोगाकडे दिनांक-१४/०८/२०२३ रोजीच्या पत्रान्वये लेखी खुलासा सादर करुन असे नमूद केले आहे की, दि.१९/०४/२०१७ अन्वये दि.२०/०४/२०१७ पासून ते दि.२३/०७/२०१७ पर्यंत गॅरेज विभाग मेकॅनिक(स्वच्छता) या पदावरुन वाहन विभागात वाहन विभाग प्रमुख म्हणून बदली झाली. दि.२४/०७/२०१७अन्वये दि.२४/०७/२०१७ पासून ते दि.०५/०४/२०१८ पर्यंत गॅरेज विभागातून बदली झाली. दि.२९/११/२०१७ अन्वये दि.३०/११/२०१७ पासून ते दि.०५/०४/२०१८ पर्यंत जलशुध्दीकरण केंद्रातून वाहन विभाग प्रमुख बदली झाली. दि.०६/०४/२०१८ अन्वये दि.०६/०४/२०१८ पासून वाहन विभाग प्रमुख पदावरुन जलशुध्दिकरण केंद्रात बदली झाली. दि.२०/०४/२०१७ पासून ते दि.०६/०४/२०१८ पर्यंत ४ वेळा बदली झाली. उपरोक्त माहिती अधिकार अर्ज आवक –जावक रजिस्टर नोंद घेणे कामी स्वच्छता विभागाकडील कर्मचारी यांच्या कडे सोपविण्यात आले होते. सदर माहिती अर्ज मला कळविण्यात आला नाही. सन २०१७ पासून स्वच्छता विभाग व गॅरेज विभाग वेगळे करण्यात आले होते. सदर कालावधीत माहिती अधिकार अर्ज माझ्याकडे आला नसल्याने त्यावर कार्यवाही मला करता आली नाही म्हणून अपिलार्थी माहिती पुरविण्यात आलेली नाही. श्री.एकबाल अहमद जान मोहमद (गॅरेज इन्चार्ज) यांनी मला कार्यभार हस्तांतरित न केल्याने सदर माहिती अर्ज मला मिळाला नाही म्हणून पुढील कार्यवाही करता आली नाही.तरी वरील प्रमाणे माझा खुलासा मान्य करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४) प्रस्तुत अपिलासंदर्भातील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, या प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा गॅरेज इन्चार्ज, मालेगांव, महानगरपालिका, मालेगांव, श्री.सचिन साहेबराव पाटील, यांनी माहिती पुरविण्यास टाळाटाळ केल्याचे दिसून येत नाही. त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी केलेला खुलासा समर्थनीय आहे. म्हणून त्यांच्यावर शास्तीची कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा गॅरेज इन्चार्ज, मालेगांव, महानगरपालिका, मालेगांव, श्री.सचिन साहेबराव पाटील, यांनी केलेला खुलासा समाधानकारक असल्याने मान्य करण्यात येऊन प्रस्तावित शास्तीची कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.

२) प्रस्तुत अपील अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

स्थळ:- नाशिक,

दिनांक:-

जावक क्र. ४१७-१२५८ 28 MAY 2024